Toppersnotes®
Unleash the topper in you

MPSC

गट ब आणि क

संयुक्त परीक्षा (पूर्व + मुंख्य)

बुकलेट - 4

अर्थशास्त्र आणि कायदे

SIERRA INNOVATIONS

INDEX

S No.	Chapter Title	Page No.
1	अर्थशास्त्र, जग आणि भारत	1
2	राष्ट्रीय उत्पन्न	5
3	दारिद्र्य, बेरोजगारी आणि विकास	10
4	पैसा	15
5	चलनवाढ	18
6	भारतीय वित्तीय बाजार	23
7	भारतीय रिझर्व्ह बँक आणि मौद्रिक धोरण	29
8	सार्वजनिक वित्त आणि राजकोषीय धोरण	33
9	कर रचना	40
10	कृषी	46
11	सहकारी संस्था	57
12	उद्योग	60
13	सेवाक्षेत्र	67
14	पायाभूत सुविधा	69
15	परकीय व्यापार	78
16	उदारीकरण, खासगीकरण, जागतिकीकरण	85
17	क्षेत्रीय संघटना	95
18	पंचवार्षिक योजना	100
19	लोकसंख्या आणि जनसांख्यिकी	108
20	विकास योजना	113
21	शाश्वत विकास	120
22	माहितीचा अधिकार अधिनियम, 2005	123
23	प्रारंभिक	127

INDEX

S No.	Chapter Title	Page No.
24	माहितीचा अधिकार आणि सार्वजनिक प्राधिकरणांवरील आबंधने	130
25	केंद्रीय माहिती आयोग	136
26	राज्य माहिती आयोग	139
27	माहिती आयोगांचे अधिकार व कार्ये, अपील व शास्ती	142
28	संकीर्ण	145
29	अनुसूच्या	149
30	महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम 2015	150
31	प्रारंभिक	153
32	संकीर्ण	156

प्रकरण 1

अर्थशास्त्र, जग आणि भारत (Economics, World and India)

अर्थशास्त्र म्हणजे काय? (What is Economics?)

परिभाषा व स्वरूप

- अर्थशास्त्र ही संपत्तीची उत्पत्ती, वापर आणि हस्तांतरणाचा अभ्यास करणारी एक ज्ञानशाखा आहे.
- उत्पादन, वितरण आणि वापर या प्रक्रियांचा अभ्यास करून अर्थव्यवस्थेचे स्वरूप समजून घेण्याचे कार्य हे सामाजिक शास्त्र करते.
- **शब्दव्युत्पत्ती**: Economics हा शब्द ग्रीक oikonomia पासून आला आहे. Oikos = घर Nomos = नियम. मूळ अर्थ: गृहव्यवस्थापन. पुढे हा अर्थ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अर्थनियमनाकडे वळला.
- **ॲडम स्मिथ (1776)** - "राष्ट्राच्या संपत्तीचे स्वरूप आणि कारणांची चिकित्सा म्हणजे अर्थशास्त्र" अशी व्याख्या दिली.

संकल्पना व विभागणी

- **रॅग्नर फ्रिश** (पहिले नोबेल विजेते) - अर्थशास्त्राचे दोन भाग केले: सूक्ष्मअर्थशास्त्र (Micro economics) आणि बृहत् अर्थशास्त्र (Macro economics)

सूक्ष्मअर्थशास्त्र (Micro Economics)

- **व्याप्ती**: व्यक्ती, ग्राहक, विक्रेता, उद्योग, मजूर, विशिष्ट बाजार व सेवांचा अभ्यास.
- **उदाहरण**: गव्हाचा लिलाव - जास्त उत्पादनामुळे भाव कमी होणे, कमी उत्पादनामुळे भाव वाढणे.
- **मुख्य शास्त्रज्ञांचे योगदान**: निकोलस बर्नोली, आल्फ्रेड मार्शल, जॉन व्हॉन न्यूमन, ऑस्कार मार्गेनस्टर्न.

बृहत् अर्थशास्त्र (Macro Economics)

- **व्याप्ती**: राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील आर्थिक प्रक्रिया. अभ्यासाचे विषय: राष्ट्रीय उत्पन्न, महागाई, बेरोजगारी, कर व सार्वजनिक वित्त, राजकोषीय व चलनविषयक धोरण, परकीय व्यापार धोरण
- **उदाहरण**: 2008 आर्थिक संकट → भारत सरकारने राजकोषीय तूट वाढवली, खर्च वाढवला, RBI ने व्याजदर कमी केले.
- **मुख्य शास्त्रज्ञांचे योगदान**: जॉन मेनार्ड केन्स, मिल्टन फ्रिडमन, अमर्त्य सेन, पॉल क्रुगमन.

अर्थव्यवस्थेचा प्रकार (Types of Economic System)

1) **आदेशात्मक अर्थव्यवस्था (Command / Planned Economy)**
   - उत्पादन, गुंतवणूक, किमती, उत्पन्न यावर सरकारचे पूर्ण नियंत्रण. उत्पादनाची साधने सार्वजनिक मालकीची.
   - जीवनावश्यक वस्तूंवर भर.
   - समाजवादी देशांत प्रामुख्याने आढळते.
   - उदा. भारत (1950-2014 नियोजन आयोग कालखंड).
   - **नियोजनाचे प्रकार:**
     - **आदेशात्मक नियोजन (Imperative Planning):** केंद्रित, सक्तीचे.
     - **सूचकात्मक नियोजन (Indicative Planning):** लक्ष्य सुचविले जाते, बळजबरी नाही. → मिश्र अर्थव्यवस्थेकडे झुकते.

2) **बाजार अर्थव्यवस्था (Market Economy)**
   - सरकारचे नियंत्रण नगण्य, मागणी व नफा यावर उत्पादन आधारित.
   - स्वयंचलित / अनियोजित / मुक्त अर्थव्यवस्था असेही म्हणतात.

- भांडवलशाही देशांत प्रामुख्याने आढळते.
- उदा. अमेरिका.

3) मिश्र अर्थव्यवस्था (Mixed Economy)

- आदेशात्मक + बाजार या दोन्हीचे गुणधर्म. सार्वजनिक + खासगी क्षेत्र सहअस्तित्व.
- उदा. भारत (1948 पासून मिश्र अर्थव्यवस्था).

भारतातील अर्थव्यवस्थेचा प्रवास

1. **स्वातंत्र्यपूर्व काळ:** इंग्लंडच्या भांडवलशाही प्रभावामुळे भारत भांडवलशाही/बाजार अर्थव्यवस्थेकडे.
2. **1948:** पहिले औद्योगिक धोरण - मिश्र अर्थव्यवस्था.
3. **1951:** पहिली पंचवार्षिक योजना. आदेशात्मक अर्थव्यवस्थेकडे झुकाव.
4. **1956:** दुसरी योजना व दुसरे औद्योगिक धोरण - समाजवादी समाजरचना (लोकशाही समाजवाद).
5. **1991:** आर्थिक उदारीकरण, नवीन औद्योगिक धोरण. आदेशात्मक कडून → सूचकात्मक नियोजन. बाजार अर्थव्यवस्थेकडे वाटचाल. सामाजिक नियोजनावर भर.
6. **2015 नंतर:** भारत धड बाजार अर्थव्यवस्थाही नाही, आदेशात्मकातून पूर्ण बाहेरही नाही → चक्रव्यूह आव्हान.

निष्कर्ष: भारत मिश्र अर्थव्यवस्था आहे; आदेशात्मक अर्थव्यवस्थेतून बाजार अर्थव्यवस्थेकडे प्रवास करीत आहे.

विकास अवस्था (Stages of Development)

विकास अवस्थांचे प्रकार

A) अविकसित देश (Undeveloped Countries)

- **वैशिष्ट्ये:** कमी दरडोई उत्पन्न (≤ 1,135 डॉलर), कमी राहणीमान, अविकसित औद्योगिक क्षेत्र, HDI ≤ 0.550.
- **रॅगनर नर्क्स:** “A country is poor, because it is poor” - भांडवलाची कमतरता → दारिद्र्य कायम राहते. अविकसित देश म्हणजे भांडवलाची कमतरता असणारे देश.
- **पॉल रोझेन्स्टीन रोडान:** मोठ्या भांडवल गुंतवणुकीने (Big Push) विकास साधता येवू शकतो असे देश म्हणजे अविकसित देश.
- **जेकब वाइनर:** मुबलक मजूर व साधनसंपत्ती असूनही दरडोई उत्पन्न वाढत नाही असे देश म्हणजे अविकसित देश.

B) विकसनशील देश (Developing Countries)

- **वैशिष्ट्ये:** उत्पन्न कमी, सामाजिक निर्देशांक असमाधानकारक, सार्वजनिक सेवा अपुऱ्या.
- **UNDP:** HDI 0.550-0.699 = मध्यम विकसित; 0.700-0.799 = उच्च विकसित (दोन्ही विकसनशीलात धरले जातात).
- **जागतिक बँक (2023):** कमीमध्यम उत्पन्न देश = 1,136-4,465 डॉलर. उच्चमध्यम उत्पन्न देश = 4,466-13,845 डॉलर.

C) विकसित देश (Developed Countries)

- **वैशिष्ट्ये:** उच्च उत्पन्न, आधुनिक तंत्रज्ञान, तीव्र औद्योगिकीकरण. **उदाहरणे:** अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलिया,.
- **UNDP:** HDI ≥ 0.800.
- **जागतिक बँक:** दरडोई उत्पन्न ≥ 13,846 डॉलर.

विकास अवस्थेचे निर्देशक

1. **राष्ट्रीय उत्पन्न (GDP):** IMF World Economic Outlook: अमेरिका - प्रथम क्रमांक, भारत - चौथा क्रमांक, PPP आधारावर भारत तिसऱ्या क्रमांकावर.
2. **दरडोई उत्पन्न:** IMF: लक्झेमबर्ग - सर्वोच्च. भारत - 138 वा क्रमांक.
3. **मानव विकास निर्देशांक (HDI):** UNDP 2023-24: स्वित्झर्लंड - 0.967 (प्रथम). भारत - 0.644 (134 वा क्रमांक).

निष्कर्ष: भारताची विकास अवस्था - राष्ट्रीय उत्पन्न पातळीवर: **विकसित,** दरडोई उत्पन्न व HDI पातळीवर: **विकसनशील,** भांडवलनिर्मिती पातळीवर: **अविकसित.** अंतिम निष्कर्ष: **भारत हा** विकसनशील देश **आहे.**

जनसांख्यिकी (Demography)

1. **UNFPA - State of World Population Report 2023**
   - भारताची लोकसंख्या: **142.8 कोटी** (जगात पहिला क्रमांक).
   - जगातील 17.75% लोकसंख्या भारतात राहते.
   - भारताची लोकसंख्या अमेरिका + इंडोनेशिया + पाकिस्तान + नायजेरीया + ब्राझील या पाच देशांच्या लोकसंख्येपेक्षा जास्त आहे.
2. **भारताचा लोकसंख्या प्रवास:** 1951 → 36.1 कोटी, 2011 → 121.08 कोटी, 2023 → 142.8 कोटी

जनसांख्यिकीय लाभांश (Demographic Dividend)

- अर्थव्यवस्था प्रगत होताना: आधी मृत्यूदर कमी होतो. नंतर जन्मदर कमी होतो. बालमृत्यूदर व शिशूमृत्यूदर घटतात. परिणामी एक अवस्था (2-4 दशके) निर्माण होते, ज्या काळात कार्यकारी वयोगटातील (15-64) लोकसंख्या जास्त असते आणि बालक व वृद्ध यांचे प्रमाण कमी असते. या "तरुण ऊर्जेमुळे" अर्थव्यवस्थेला मिळणारी गती = **जनसांख्यिकीय लाभांश**.
- भारतातील परिस्थिती:
  - **2011 जनगणना:**
    - कार्यकारी वयोगट (15-64 वर्षे): 76.77 कोटी (63.4%).
    - तरुण वयोगट (15-24 वर्षे): 23.19 कोटी (19.2%).
    - 0-24 वर्षे लोकसंख्या: 60.43 कोटी (49.9%).
    - साक्षरता दर: 72.98%.
  - **NFHS-5 (2019-21):**
    - एकूण जननदर (TFR): 2 (2016 मध्ये 2.3 होता).
    - पुनःस्थापना स्तर (Replacement Level): 2.1 → भारत आता त्याखाली आला आहे.
  - **भविष्य:**
    - 2026 पर्यंत कार्यकारी वयोगटाचे प्रमाण **68.4%** होईल.
    - भारत सध्या sweet spot मध्ये आहे - जग मंदीत असूनही भारताचा विकासदर जास्त.

निष्कर्ष: पुढील दशकांमध्ये भारताला जनसांख्यिकीय लाभांश **मिळवण्याची सर्वोत्तम संधी उपलब्ध झाली आहे.** योग्य धोरणे (शिक्षण, कौशल्यविकास, रोजगारनिर्मिती) राबवली तर ही लोकसंख्या आर्थिक वाढीचा मुख्य इंजिन ठरू शकते.

क्षेत्रीय रचना (Sectoral Structure)

- अर्थव्यवस्थेतील आर्थिक क्रियांचे साधारण वर्गीकरण **प्राथमिक (Primary):** कृषी , **द्वितीयक (Secondary):** उद्योग, **तृतीयक (Tertiary):** सेवा अशा 3 क्षेत्रांत केले जाते. आधुनिक अर्थशास्त्रात आणखी दोन क्षेत्रांचा विचार होतो: **चतुर्थक क्षेत्र (Quaternary):** ज्ञानाधारित क्रिया. **पंचम क्षेत्र (Quinary):** बौद्धिक संपदा, उच्च व्यवस्थापन.
- क्षेत्रीय रचना मोजण्याचे दोन निकष

1. **राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा:** इंग्लंड: कृषी = 0.7% (GDP). टांझानिया: कृषी = 24.3% (GDP).
2. **रोजगारातील वाटा:** इंग्लंड: कृषी = 1%. टांझानिया: कृषी = 64.3%.

भारताची क्षेत्रीय रचना

- **राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा:** GDP मध्ये कृषीचा वाटा कमी, सेवाक्षेत्राचा जास्त → सकारात्मक बदल. (स्वातंत्र्यानंतर - कृषीप्रधान. दुसरी पंचवार्षिक योजना - उद्योगप्रधान. 1991 नंतर - सेवा क्षेत्र प्रेरक.)
- **रोजगारातील वाटा**: कृषीवर अवलंबून लोकसंख्या = 55%. सेवाक्षेत्रावर अवलंबून लोकसंख्या = 31%.

निष्कर्ष: उत्पन्नाचा स्त्रोत → कृषी → उद्योग → सेवा. परंतु जवळपास निम्मी लोकसंख्या अजूनही कृषीवर अवलंबून आहे.

उत्पन्नाचे वाटप (Income Distribution)

संकल्पना

- आर्थिक वाढ **समावेशक (inclusive growth)** असावी, म्हणजे उत्पन्न वाढताना समाजातील सर्व स्तरांमध्ये त्याचा लाभ पोहोचला पाहिजे.
- उत्पन्नातील तफावत मोजण्यासाठी प्रमुख निर्देशांक:
  - **गिनी गुणांक / गिनी निर्देशांक** (Gini Coefficient / Gini Indicator).

- **Income Quintile Ratio (उत्पन्न पंचमक गुणोत्तर).**
- **Palma Ratio (पाल्मा गुणोत्तर).**

भारतातील उत्पन्न असमानता

- **Oxfam (2018):** सर्वाधिक श्रीमंत 1% लोकांकडे 73% राष्ट्रीय उत्पन्न.
- **Oxfam (2023):**
  - श्रीमंत 5% → देशाच्या 60% संपत्तीचे मालक.
  - गरीब 50% → फक्त 3% संपत्तीचे मालक.
- **गिनी निर्देशांक बदल:**
  - 2005-13 → 33.6
  - 2010-22 → 34.2 (असमानता वाढली).

निष्कर्ष: भारताचा गिनी निर्देशांक मध्यम स्वरूपाची उत्पन्न असमानता दर्शवतो. पण ती **हळूहळू वाढते आहे**, त्यामुळे समावेशक विकासाची गरज तीव्र आहे.

गिनी गुणांक

- **मांडणी**: क्ष-अक्ष = लोकसंख्या (गरीब → श्रीमंत). य-अक्ष = त्या गटाचा उत्पन्नातील वाटा.
- **लॉरेन्झ वक्ररेषा (Lorenze Curve):**
  - परिपूर्ण समानता → 45° सरळ रेषा. असमानता वाढली की वक्रता वाढते.
- **गिनी गुणांक (0-1):**
  - 0 = संपूर्ण समानता. 1 = संपूर्ण विषमता.
- **गिनी निर्देशांक (0-100):**
  - 0 = संपूर्ण समानता. 100 = संपूर्ण विषमता.

दारिद्र्य (Poverty)

- दारिद्र्य दोन प्रकारचे मानले जाते:

1. **सापेक्ष दारिद्र्य (Relative Poverty):** उत्पन्नातील असमानतेवर आधारित → गिनी गुणांक वापरतात.
2. **निरपेक्ष दारिद्र्य (Absolute Poverty):** जीवनावश्यक गरजांची पूर्तता होण्याइतपत उत्पन्न न मिळणे.

- भारतासारख्या विकसनशील आणि काँगो सारख्या अविकसित देशांत **निरपेक्ष दारिद्र्य मोजणे अधिक महत्त्वाचे**.

दारिद्र्य रेषा (Poverty Line) - आंतरराष्ट्रीय स्तरावर

- **जागतिक बँकेचे निकष (PPP - Purchasing Power Parity):**
  - 1981 - $1 प्रति व्यक्ती/प्रतिदिन, 1993 - $1.08, 2005 - $1.25, 2011 - $1.90, 2022 - $2.15

भारतातील दारिद्र्य

- **आंतरराष्ट्रीय स्तरावर 2022 (2.15$ निकष):**
  - जगात - 9% लोकसंख्या गरीब. भारतात - 11.9% (16.75 कोटी लोक). जगातील दारिद्र्य रेषेखालील 24% लोक भारतात.
- **राष्ट्रीय पातळीवर:**
  - **तेंडुलकर समिती (2011):** भारतातील दारिद्र्य प्रमाण - 21.9%.

निष्कर्ष: भारतातील जवळपास **प्रत्येक पाचपैकी एक व्यक्ती दारिद्र्यात** आहे. जगातील गरीब लोकांपैकी 1/5 हून अधिक भारतात आहेत.

बेरोजगारी (Unemployment)

- **बेरोजगारी** म्हणजे काम करण्याची इच्छा व क्षमता असूनही काम न मिळणे.
- चांगली आर्थिक वाढ साधली तर बेरोजगारी कमी होते.

फिलिप्स वक्ररेषा (Phillip's Curve)

- **विल्यम फिलिप्स (1914-1975):** बेरोजगारी आणि चलनपुरवठा यांचा सहसंबंध मांडला. नंतरच्या अर्थतज्ज्ञांनी चलनपुरवठ्याऐवजी **महागाई** हा शब्द वापरला.
- **निष्कर्ष**: महागाई वाढली → बेरोजगारी कमी. महागाई कमी झाली → बेरोजगारी वाढली.

आंतरराष्ट्रीय स्थिती

- **ILO - World Employment Social Outlook Report 2024:**
  - 2023 मध्ये जागतिक बेरोजगारी दर = **5.1%**. कोविड-19 महामारीमुळे बेरोजगारीत मोठी वाढ झाली.

भारतातील स्थिती

- **2018:** बेरोजगारी दर = **2.6%**.
- **2023:** बेरोजगारी दर = **4.2%** (ILO अहवाल). कारणे: भारतीय अर्थव्यवस्थेतील मंदी, कोविड-19 महामारीचा परिणाम.

निष्कर्ष: भारतात रोजगारनिर्मितीसाठी भांडवल गुंतवणूक, कौशल्य विकास व उद्योग विस्तार **यावर भर देणे गरजेचे आहे.**

2 प्रकरण

राष्ट्रीय उत्पन्न (National Income)

राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे काय? (What is National Income?)

- राष्ट्रीय उत्पन्न हे एखाद्या देशाच्या एका वर्षातील एकूण आर्थिक क्रियाकलापांचे मोजमाप आहे.
- **मार्शल व पिगू:** "राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे वार्षिक वस्तू व सेवांचे उत्पादन." (उत्पादन पद्धत)
- **आयर्विंग फिशर:** "राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे वार्षिक वस्तू उत्पादन नव्हे, तर त्या वस्तूंपासून मिळणाऱ्या सेवांचा उपभोग." (खर्च/उपभोग पद्धत)
- **विल्यम पेटी (17वे शतक):** यांनी सर्वप्रथम (आयर्लंडचे) राष्ट्रीय उत्पन्न मोजण्याचा प्रयत्न केला.
- **सायमन कुझनेट्स (1941):** यांनी शास्त्रोक्त पद्धतीने राष्ट्रीय उत्पन्न मोजण्याची पद्धत विकसित केली व अमेरिकेचे उत्पन्न मोजले. या कार्यासाठी त्यांना **1971 चे अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक** मिळाले.

भारतात राष्ट्रीय उत्पन्न मोजण्याचा इतिहास

- **दादाभाई नौरोजी (1867-68):** भारताचे राष्ट्रीय उत्पन्न मोजणारे पहिले तज्ज्ञ. त्यांनी 'पॉवर्टी अँड अनब्रिटीश रूल' या पुस्तकात **'संपत्तीचा निचरा' (Drain of Wealth)** या संकल्पनेचे विवेचन केले. त्यांना भारताचे दरडोई उत्पन्न **20 रु.** आढळले.
- **इतर तज्ज्ञ:** फिन्डले शिरास (1911, दरडोई उत्पन्न 49 रु.), वाडिया आणि जोशी (1913-14, दरडोई उत्पन्न 44.30 रु.).
- **डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव:** यांनी सर्वप्रथम शास्त्रोक्त पद्धतीचा वापर केला. त्यांना 1925-29 मध्ये दरडोई उत्पन्न **76 रु.** आणि 1931-32 मध्ये **62 रु.** आढळले.
- **राष्ट्रीय उत्पन्न समिती (ऑगस्ट 1949):** स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने ही समिती स्थापन केली.
    - **अध्यक्ष:** प्रो. **पी. सी. महालनोबिस**
    - **सदस्य:** प्रो. डी. आर. गाडगीळ व डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव.
    - **समितीचे निष्कर्ष (1954):** 1948-49 चे राष्ट्रीय उत्पन्न **8,650 कोटी रू.** व दरडोई उत्पन्न **246.90 रू.** निश्चित करण्यात आले.

राष्ट्रीय उत्पन्न मोजण्याच्या पद्धती (Methods of Calculating National Income)

- एखाद्या अर्थव्यवस्थेचे उत्पन्न तीन मुख्य पद्धतींनी मोजता येते:

A) उत्पन्न पद्धत (Income Method)

- **व्याप्ती:** देशांतर्गत सर्व संस्थांनी (घरगुती व फर्म) एका आर्थिक वर्षात कमावलेले एकूण उत्पन्न.
- **सूत्र:** GDP = भाडे (R) + वेतन (W) + व्याज (I) + नफा (P)
- **महत्त्वाचे मुद्दे:**
    - **देशांतर्गत:** देशाच्या भौगोलिक सीमेतील सर्व उत्पन्न समाविष्ट होते.
    - **कमावलेले उत्पन्न:** केवळ कमावलेले उत्पन्न (Earned Income) विचारात घेतले जाते. बेरोजगारी भत्ता, सबसिडी यासारखी **हस्तांतरण देयके (Transfer Payments)** विचारात घेतली जात नाहीत.

B) उत्पादन पद्धत (Product Method)

- **व्याप्ती:** देशांतर्गत एका आर्थिक वर्षात उत्पादित झालेल्या सर्व **अंतिम वस्तू व सेवांचे मौद्रिक मूल्य**.

- **सूत्र:** GDP = (वस्तूंचे मूल्य (G) + सेवांचे मूल्य (S)) - आंतरसंक्रामक वापर (IC)
- **महत्त्वाचे मुद्दे:**
  - **अंतिम वस्तू:** फक्त अंतिम वस्तू व सेवांचे मूल्य मोजले जाते. आंतरसंक्रामक वस्तू (उदा. ब्रेडसाठीचा गहू) वजा केला जातो.
  - **मूल्यवर्धन:** ही पद्धत प्रत्यक्षात प्रत्येक टप्प्यावर झालेले मूल्यवर्धन मोजते.
  - **क्षेत्रीय रचना:** अर्थव्यवस्थेतील कृषी, उद्योग व सेवा क्षेत्राचे सापेक्ष महत्त्व दर्शवते.

C) खर्च पद्धत (Expenditure Method)

- **व्याप्ती:** देशातील सर्व संस्थांनी (कुटुंब, फर्म, सरकार) वस्तू व सेवांवर केलेला एकूण खर्च व निव्वळ निर्यात.
- **सूत्र:** GDP = उपभोग खर्च (C) + गुंतवणूक खर्च (I) + सरकारी खर्च (G) + (निर्यात (X) - आयात (M))
- **महत्त्वाचे मुद्दे:**
  - **निव्वळ निर्यात:** परदेशाचा प्रभाव दर्शविते.
  - **त्रुटीरहित:** ही पद्धत तुलनेने अधिक त्रुटीरहित मानली जाते.

GDP: किमतीचे प्रकार

- **घटकमूल्य किंमत (Factor-Cost Price):** उत्पादनाच्या मूळ घटकांची (श्रम, भांडवल) किंमत. कर व सबसिडी वगळलेली.
- **मूळ किंमत (Basic Price):** घटकमूल्य + **उत्पादन कर** (उदा., नोंदणी शुल्क) - **उत्पादन सबसिडी** (उदा., उद्योग सबसिडी).
- **बाजार किंमत (Market Price):** मूळ किंमत + **उत्पाद कर** (उदा., GST) - **उत्पाद सबसिडी** (उदा., इंधन सबसिडी).

Nominal vs Real GDP

- **Nominal GDP: चालू किमती**ना (Current Prices) मोजलेले उत्पन्न. यात महागाईचा समावेश असतो.
- **Real GDP: स्थिर किमती**ना (Constant Prices) मोजलेले उत्पन्न. महागाईचा परिणाम काढून टाकल्यामुळे अर्थव्यवस्थेची खरी वाढ दर्शवते.
- **आधारभूत वर्ष (Base Year):** Real GDP मोजण्यासाठी एक आधार वर्ष निश्चित केले जाते. सध्या भारतासाठी हे **2011-12** हे आधारभूत वर्ष आहे.
- **GDP Deflator:** Nominal GDP ला Real GDP ने भागून महागाईचा सामान्य दर मोजता येतो.

भारतातील GDP मोजण्याची नवीन पद्धत (2015 पासून)

- **प्रधान GDP: स्थिर बाजार किमतीवरील GDP** (GDP at Constant Market Price) हा GDP म्हणून गणला जातो. (पूर्वी स्थिर घटकमूल्य किंमत वापरली जात होती.)
- **परिणाम:** अप्रत्यक्ष करांच्या समावेशामुळे GDP चे आकडे जास्त भरतात आणि ते आंतरराष्ट्रीय मानकांशी सुसंगत होतात.
- **क्षेत्रीय रचना:** कृषी, उद्योग, सेवा क्षेत्राचे योगदान आता **स्थिर मूळ किमतीवरील GDP** द्वारे मोजले जाते.

क्षेत्रीय स्थूल देशांतर्गत उत्पादन (Sectoral GDP)

- अर्थव्यवस्थेतील विविध आर्थिक क्रियांच्या स्वरूपावरून त्यांचे वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये वर्गीकरण केले जाते. यालाच क्षेत्रीय GDP असे म्हणतात.
- क्षेत्रीय GDP ची रचना मांडताना **स्थिर मूळ किमतीला (Constant Basic Price)** मोजलेला GDP विचारात घेतला जातो.
- **आंतरराष्ट्रीय वर्गीकरण:** संयुक्त राष्ट्रसंघाची **ISIC (International Standard Industrial Classification)** ही पद्धत भारतासह जगभर वापरली जाते.

क्षेत्रांचे प्रकार

A) प्राथमिक क्षेत्र (Primary Sector)

- **व्याप्ती:** नैसर्गिक स्त्रोतांपासून थेट उत्पादने घेणाऱ्या क्रिया. याला **कृषी व संलग्न क्षेत्र** असेही म्हणतात.
- **उदाहरणे:** कृषी, पशुपालन, वनसंवर्धन, मत्स्योद्योग, खाणकाम व उत्खनन.

B) द्वितीयक क्षेत्र (Secondary Sector)

- **व्याप्ती:** प्राथमिक क्षेत्रातील उत्पादनांचे इतर उत्पादनांमध्ये रूपांतर करणाऱ्या क्रिया. याला **उद्योग क्षेत्र** असेही म्हणणत.
- **उदाहरणे:** वस्त्रोद्योग, लोह-पोलाद, वाहने, इलेक्ट्रॉनिक्स, औषधे, रसायने, फर्निचर, प्लास्टिक वस्तू इत्यादी उत्पादन.

C) तृतीयक क्षेत्र (Tertiary Sector)

- **व्याप्ती:** प्राथमिक व द्वितीयक क्षेत्राला पूरक अश्या सेवा क्रिया. याला **सेवा क्षेत्र** असेही म्हणतात.
- **उदाहरणे (वर्गीकरणासह):**
  - **वितरण सेवा:** वाहतूक, दळणवळण, घाऊक-किरकोळ व्यापार.
  - **व्यावसायिक सेवा:** बँकिंग, विमा, वास्तू, माहिती तंत्रज्ञान (IT).
  - **ग्राहक सेवा:** आरोग्य, शिक्षण, हॉटेल, पर्यटन, करमणूक.
  - **ना-नफा सेवा:** लोकप्रशासन, संरक्षण, धार्मिक संस्था.

D) चतुर्थक क्षेत्र (Quaternary Sector)

- **व्याप्ती:** ज्ञान आधारित सेवा. हा तृतीयक क्षेत्राचाच एक विस्तृत भाग मानला जातो.
- **उदाहरणे:** माहिती व्यवस्थापन, सल्लागार सेवा, संशोधन आणि विकास (R&D), सांख्यिकी.

E) पंचम क्षेत्र (Quinary Sector)

- **व्याप्ती:** उच्च-स्तरीय बौद्धिक संपदेवर आधारित सेवा.
- **उदाहरणे:** वैज्ञानिक संशोधन, उच्च-स्तरीय व्यवस्थापन, नवीन कल्पना व तंत्रज्ञानाचा विकास.

स्थूल राष्ट्रीय उत्पाद (GNP - Gross National Product)

- GNP हे एका देशाच्या नागरिकांनी किंवा देशी संस्थांनी एका वर्षात, देशात किंवा परदेशात, उत्पादित केलेल्या सर्व अंतिम वस्तू व सेवांचे एकूण मौद्रिक मूल्य आहे.
- **मुख्य फरक:** GDP "देशांतर्गत" (भौगोलिक सीमा) उत्पादन मोजते, तर GNP "राष्ट्रीय" (देशाचे नागरिक) उत्पन्न मोजते.
- **मूलभूत सूत्र:** GNP = GDP + परदेशातून मिळणारे निव्वळ घटक उत्पन्न (Net Factor Income from Abroad)
  - **परदेशातून मिळणारे निव्वळ घटक उत्पन्न** = स्वकीयांनी परदेशात कमावलेले उत्पन्न (X) - परकीयांनी देशात कमावलेले उत्पन्न (M)
- **जर GNP > GDP:** याचा अर्थ देशाला परदेशातून निव्वळ उत्पन्न मिळत आहे (X > M). देशाचे नागरिक देशाबाहेर अधिक उत्पन्न कमावतात.
- **जर GNP < GDP:** याचा अर्थ देशातील उत्पन्नातील एक भाग परदेशीयांकडे जातो (M > X). परकीय नागरिक देशात अधिक उत्पन्न कमावतात.

निव्वळ राष्ट्रीय उत्पाद (NNP - Net National Product)

- NNP म्हणजे GNP मधून स्थिर भांडवलाचा घसारा (Depreciation - D) वजा केल्यानंतर उरणारे उत्पन्न.
- **घसारा (Depreciation):** मशिनरी, इमारती, उपकरणे यांसारख्या उत्पादन साधनांची झीज झाल्यामुळे होणारे मूल्यातील घट.
- **मूलभूत सूत्र:** NNP = GNP - घसारा (D)

निव्वळ देशांतर्गत उत्पाद (NDP - Net Domestic Product)

- NDP म्हणजे GDP मधून स्थिर भांडवलाचा घसारा (Depreciation) वजा केल्यानंतर देशाच्या भौगोलिक सीमेतील उरणारे उत्पन्न.
- **मूलभूत सूत्र:** NDP = GDP - घसारा (D)

दरडोई उत्पन्न (Per Capita Income)

- दरडोई उत्पन्न म्हणजे देशाचे राष्ट्रीय उत्पन्न (NNP) त्याच्या एकूण लोकसंख्येने भागून मिळणारे सरासरी उत्पन्न होय.
- हे एखाद्या देशातील लोकांच्या सरासरी आर्थिक कल्याणाचे सूचक आहे.
- **मूलभूत सूत्र:** दरडोई उत्पन्न = राष्ट्रीय उत्पन्न (NNP) / एकूण लोकसंख्या

वैयक्तिक उत्पन्न आणि व्ययक्षम उत्पन्न (Personal Income & Disposable Income)

- **वैयक्तिक उत्पन्न (PI)** म्हणजे देशातील सर्व व्यक्तींना एका वर्षात प्रत्यक्षात मिळणारे एकूण उत्पन्न.
- **व्ययक्षम उत्पन्न (DI)** म्हणजे वैयक्तिक उत्पन्नातून वैयक्तिक कर (Income Tax) व गैर-अनिवार्य बचत वजा केल्यानंतर उरणारे उत्पन्न, जे प्रत्यक्षात खर्च करता येते.

क्रयशक्ती समानता (PPP - Purchasing Power Parity)

- क्रयशक्ती समानता (PPP) हा एक आर्थिक सिद्धांत आहे, जो विनिमय दरापेक्षा वेगळ्या पद्धतीने चलनांची तुलना करतो. ही संकल्पना **कार्ल गुस्ताव कॅसेल** यांनी मांडली.
- **मूळ कल्पना:** दोन देशांच्या चलनांची तुलना करताना, त्यांची समान वस्तू आणि सेवांची "टोपली" खरेदी करण्याची क्षमता (क्रयशक्ती) पाहिली पाहिजे.
- **PPP चे महत्त्व:**
  - वास्तविक राहणीमानाची तुलना करण्यासाठी उपयुक्त.
  - विकसनशील देशांचे उत्पन्न PPP मध्ये मोजले तर ते विनिमय दराने मोजलेल्या उत्पन्नापेक्षा जास्त दिसते, कारण तेथील सेवा आणि वस्तूंच्या किमती कमी असतात.

शाश्वत उत्पन्न निर्देशांक (Indicators of Sustainable Income)

A) हरीत स्थूल देशांतर्गत उत्पादन (Green GDP)

- **व्याप्ती:** पर्यावरणीय ऱ्हास आणि नैसर्गिक स्त्रोतांच्या संपुष्टात येण्याची किंमत GDP मधून वजा करून मिळणारे समायोजित उत्पन्न.
- **मूलभूत सूत्र:** Green GDP = GDP - R - A
- **R (Restoration Cost):** पर्यावरणीय भांडवल (वने, जलस्रोत) पूर्ववत करण्यासाठी लागणारा खर्च.
- **A (Aversion Cost):** पर्यावरणीय नाश टाळण्यासाठी किंवा प्रदूषणावर मात करण्यासाठी लागणारा खर्च.
- 2011 मध्ये **पार्थ दासगुप्ता** यांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञ गट नेमण्यात आला. समितीने Green GDP ऐवजी नैसर्गिक स्त्रोत, मानवी भांडवल आणि पायाभूत संपत्ती यांचे मूल्य असलेली विस्तृत संकल्पना वापरण्याची शिफारस केली.

B) शाश्वत निव्वळ राष्ट्रीय उत्पादन (NNPs - Sustainable Net National Product)

- **व्याप्ती:** GNP मधून केवळ यंत्रसामुग्रीचाच नव्हे, तर पर्यावरणीय भांडवलाचाही घसारा वजा करून मिळणारे उत्पन्न.
- **मूलभूत सूत्र:** NNPs = GNP - Dm - Dn
- **Dm:** उत्पादित भांडवली संपत्तीचा घसारा (मशिनरी, इमारती).
- **Dn:** पर्यावरणीय भांडवलाचा घसारा (जमीन, हवा, पाणी यांच्या गुणवत्तेतील घट).

C) ढोबळ राष्ट्रीय आनंद निर्देशांक (GNH - Gross National Happiness)

- **उगम:** भूतानचे राजे **जिग्मे सिंगे वांगचुक** यांनी 1972 मध्ये मांडला. हा केवळ आर्थिक नसून एक दार्शनिक व विकासाचा मार्गदर्शक तत्त्वज्ञान आहे.

- ○ **चार आधारस्तंभ (4 Pillars):** चांगले शासन (Good Governance), शाश्वत आर्थिक व सामाजिक विकास (Sustainable Socio-economic Development), सांस्कृतिक जपणूक (Cultural Preservation), पर्यावरणीय जतन (Environmental Conservation)

व्यापारचक्र (Business Cycles)

- अर्थव्यवस्थेतील नफा, गुंतवणूक आणि पुन्हा नफा यांच्या चक्रामुळे उत्पन्न होणाऱ्या तेजी-मंदीच्या नैसर्गिक चक्रांना **व्यापारचक्र** म्हणतात. ही चक्रे भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे एक वैशिष्ट्य आहेत.
- **चक्राचा क्रम:** मंदी → पुनरुत्थान → तेजी → घसरण → पुन्हा मंदी

A) तेजी (Peak / Inflation / Boom): GDP मध्ये तीव्र वाढ.उच्च उत्पादन पातळी आणि तीव्र मागणी. महागाई असते. परंतु आटोक्यात असते. रोजगार निर्मिती होते, बेरोजगारी कमी. व्याजदर वाढतात. सरकारी करमहसुल चांगला. निर्यात वाढ, आयात कमी; चलन मजबूत.

B) घसरण (Recession): सलग **दोन तिमाही**पेक्षा जास्त काळ GDP मध्ये मध्यम घट आणि चलनघट. उत्पादनात घट. अल्पकालीन (Acute) बेरोजगारी निर्माण. व्याजदर कमी होतात. सरकारी कर्ज वाढते. आयात वाढ, निर्यात घट; चलन दुर्बल.

C) मंदी (Depression / Trough): GDP मध्ये **दीर्घकालीन आणि लक्षणीय घट**, तीव्र चलनघट किंवा बेसुमार चलनवाढ. उत्पादन आणि GDP मध्ये मोठी घट. **दीर्घकालीन (Chronic) बेरोजगारी.** व्याजदर **शून्य किंवा ऋण** होतात. सरकार कर्जबाजारी होते. चलनाचे तीव्र अवमूल्यन.

D) पुनरुत्थान (Recovery / Revival): मंदी/घसरणतून बाहेर पडण्याची सुरुवात. ऋणात्मक GDP वाढ धनात्मक होणे.

- ○ **पुनरुत्थानाचे प्रकार (Recovery Shapes):**
  1. **V-आकार:** त्वरित आणि जोरदार पुनरुत्थान. (उदा., कोविड-19 च्या पहिल्या लाटेनंतर भारत)
  2. **W-आकार:** पुनरुत्थानानंतर लगेच दुसरी मंदी. (उदा., कोविड-19 च्या दुसऱ्या लाटेसह)
  3. **U-आकार:** दीर्घकालीन मंदीनंतर हळूहळू पुनरुत्थान. (उदा., 2008-2011 ची जागतिक मंदी)
  4. **✓-आकार (Nike Swoosh):** V-पेक्षा हळू, पण निरंतर चालणारे पुनरुत्थान.
  5. **L-आकार:** मंदी टिकून राहणे, पुनरुत्थान होत नाही.

भारतातील व्यापारचक्र (कोविड-19 काळातील उदाहरण)

- **तेजी (2016-17):** GDP वाढीदर **8.3%**.
- **घसरण (2019-20):** सलग तिमाहीत GDP वाढीदर घसरण.
- **मंदी (2020-21):** कोविड-19 लॉकडाउनमुळे GDP वाढीदर **-6.6%** (वार्षिक). पहिल्या तिमाहीत तो **-23.8%** होता.
- **पुनरुत्थान (2020-21 च्या शेवटी):** GDP वाढीदर **2.5%** झाला. भारताने **V-आकाराचे पुनरुत्थान** अनुभवले.

भारताच्या V-आकाराच्या पुनरुत्थानाची कारणे: लॉकडाउन टप्प्याटप्प्याने उघडणे. **आत्मनिर्भर भारत** पॅकेज. चांगला मान्सून आणि कृषीक्षेत्राची स्थिरता. निर्यात आणि वित्तीय सेवा पूर्ववत होणे.

3 प्रकरण

दारिद्र्य, बेरोजगारी आणि विकास (Poverty, Unemployement, Development)

दारिद्र्य: संकल्पना (Poverty: Concept)

- **अमर्त्य सेन (सामाजिक निवड सिद्धांत):** शासनाने लोकांची क्षमता वाढवणाऱ्या धोरणांवर (उदा., व्यवसायासाठी कर्ज) भर द्यावा, केवळ भत्त्यावर नाही.
- **अभिजित बॅनर्जी व एस्थर डुफलो (दारिद्र्य सापळा - Poverty Trap):** गरिबी हे एक असे चक्र आहे की ज्यातून बाहेर पडण्यासाठी बाहेरील मदत (उदा., कर्ज) आवश्यक असते.
- **वाढकेंद्रित दृष्टिकोन (Growth Approach):** अर्थव्यवस्थेच्या एकूण उत्पन्नात (GDP) वाढ करणे हे प्राथमिक उद्दिष्ट.
- **मानव विकास दृष्टिकोन (Human Development Approach): महबूब-उल-हक** यांनी मांडलेला हा दृष्टिकोन उत्पन्नापेक्षा **आरोग्य, शिक्षण आणि क्रयशक्ती** यांना महत्त्व देतो. **अमर्त्य सेन** यांनी याला **'मानवी क्षमता'** (capability approach) (लोक काय करू शकतात आणि कोणत्या जीवनाची इच्छा करतात) या संकल्पनेने पुढे नेले.
- **समावेशक विकास दृष्टिकोन (Inclusive Development Approach):** मानवी विकास सर्वसमावेशक आणि समान असावा यावर भर. हे मोजण्यासाठी **GDI, IHDI, GII** सारखे निर्देशांक वापरले जातात.

जागतिक उपासमार निर्देशांक (GHI - Global Hunger Index)

- **मोजणाऱ्या संस्था:** Welthungerhilfe (जर्मनी) आणि Concern Worldwide (आयर्लंड). (2006-2017 पर्यंत IFPRI ही देखील होती).
- **मोजणी पद्धत:** खालील निर्देशांकांवर आधारित:

1. **अपुरा अन्नपुरवठा (Undernourishment):** लोकसंख्येतील कुपोषणाचे प्रमाण.
2. **बाल कुपोषण - खुरटेपणा (Child Stunting):** वयाप्रमाणे अपुरी उंची.
3. **बाल कुपोषण - शुष्कपणा (Child Wasting):** उंचीप्रमाणे अपुरे वजन.
4. **बालमृत्यू (Child Mortality):** पाच वर्षाखालील मृत्यूदर.

- **स्कोर:** 0 (श्रेष्ठ) ते 100 (भयावह). 20-34.9 = गंभीर (Serious).
- **भारताची स्थिती (2023): 111वा क्रमांक** (125 देशांमध्ये). GHI स्कोर = **28.7** (गंभीर श्रेणी). श्रीलंका (60), नेपाळ (69), बांगलादेश (81), पाकिस्तान (102) यापेक्षा खालचा.

निरपेक्ष आणि सापेक्ष दारिद्र्य (Absolute and Relative Poverty)

- **सापेक्ष दारिद्र्य -** लोकसंख्येचे सरासरी उत्पन्न काढून या सरासरीपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्यांना सापेक्ष गरीब (relatively poor) म्हणता येईल. 'त्याच्यापेक्षा हा गरीब' या तत्वावर सापेक्ष दारिद्र्य मोजले जाते. सापेक्ष दारिद्र्य दर्शवणारा उत्तम निर्देशांक म्हणजे गिनी निर्देशांक.
- **निरपेक्ष दारिद्र्य -** किमान जीवनावश्यक गरजा (उदाहरणार्थ - अन्न, वस्त्र, निवारा इ.) पूर्ण करू शकण्याइतपत कमावू न शकणाऱ्याला निरपेक्ष गरीब (absolutely poor) म्हणता येईल. उदाहरणार्थ - 1973-74 मध्ये नियोजन आयोगाने ग्रामीण भारतासाठी 2400 कॅलरी दैनिक दरडोई अन्न हे किमान जीवनावश्यक मानक ठरवले.
- नॉर्वेसारख्या अतिविकसित देशांमध्ये प्रत्येकाच्याच किमान जीवनावश्यक गरजा पूर्ण झाल्यासारख्या आहेत. यामुळे विकसित देशांमध्ये सापेक्ष दारिद्र्य मोजण्यालाच वाव असतो. भारतासारख्या विकसनशील किंवा नायजरसारख्या अविकसित देशांना निरपेक्ष दारिद्र्य मोजण्याची गरज भासत असते.

Unleash the topper in you

उत्पन्न दारिद्र्य (Income Poverty) & भारतातील दारिद्र्यरेषेचा इतिहास

- दारिद्र्यरेषा ठरवण्यासाठी भारतात विविध समित्या स्थापन झाल्या:

1. **अलघ समिती (1979)**
   - **मानक:** कॅलरीवर आधारित.
     - ग्रामीण: **2400 कॅलरी/व्यक्ती/दिवस**
     - शहरी: **2100 कॅलरी/व्यक्ती/दिवस**
   - **निरीक्षण (1973-74):** एकूण दारिद्र्य **54.9%**. (ग्रामीण: 56.4%, शहरी: 49%).
2. **लकडावाला समिती (1993)**
   - **सुधारणा:** अलघ समितीचे कॅलरी मानक राखले, पण चलनवाढ मोजण्यासाठी **CPI-AL (ग्रामीण)** आणि **CPI-IW (शहरी)** निर्देशांक वापरले. राज्यांसाठी वेगवेगळ्या दारिद्र्यरेषा ठरवल्या.
   - **निरीक्षण:** दारिद्र्यात घट झाली. 1993-94 मध्ये एकूण दारिद्र्य **36%** होते.
3. **तेंडुलकर समिती (2009)**
   - **महत्त्वाची सुधारणा:** दारिद्र्य टोपलीत **केवळ अन्न नव्हे, तर शिक्षण व आरोग्य** यांचा समावेश केला.
   - **निरीक्षण:** दारिद्र्याचे आकडे वाढले. 2004-05 चे दारिद्र्य लकडावाला पद्धतीने 27.5% होते, तेंडुलकर पद्धतीने **37.2%** झाले.
   - **2011-12 चे आकडे (तेंडुलकर):** एकूण दारिद्र्य **21.9%**. (ग्रामीण: 25.7%, शहरी: 13.7%).
4. **रंगराजन समिती (2014)**
   - **महत्त्वाची सुधारणा:** दारिद्र्य टोपलीत **अन्न, शिक्षण, कपडे, निवारा, वाहतूक आणि इतर घटक** यांचा समावेश केला. कॅलरी मानक कमी केले (ग्रामीण: 2155, शहरी: 2090).
   - **दारिद्र्यरेषा (2011-12):**
     - ग्रामीण: **₹32/व्यक्ती/दिवस**
     - शहरी: **₹47/व्यक्ती/दिवस**
   - **निरीक्षण (2011-12):** एकूण दारिद्र्य **29.5%**. (ग्रामीण: 30.9%, शहरी: 26.4%).

बहुआयामी दारिद्र्य (Multidimensional Poverty)

A) जागतिक बहुआयामी निर्धनता निर्देशांक (Global MPI)
- **मोजणाऱ्या संस्था: UNDP** आणि **ऑक्सफर्ड पोव्हर्टी अँड ह्युमन डेव्हलपमेंट इनिशिएटिव्ह (OPHI)**.
- **मोजणी पद्धत:** 3 आयाम आणि 10 निर्देशकांवर आधारित. प्रत्येक आयामाला 1/3 भारांश दिला जातो.
- **आरोग्य (Health) (1/3)**
  - पोषण (Nutrition) (1/6)
  - बालमृत्यू (Child Mortality) (1/6)
- **शिक्षण (Education) (1/3)**
  - शालेय शिक्षणातील वर्षे (Years of Schooling) (1/6)
  - शाळेतील उपस्थिती (School Attendance) (1/6)
- **राहणीमान (Living Standards) (1/3)**
  - इंधन, स्वच्छता, पेयजल, वीज, घर, मालमत्ता (प्रत्येकी 1/18 भारांश)
- **महत्त्वाचे मूल्ये:**
- **बहुआयामी गरीब:** ज्या कुटुंबाला 33.33% पेक्षा जास्त गुण (नागवणूक दर - deprivation score) असतात.
- **तीव्र बहुआयामी गरीब:** ज्या कुटुंबाला 50% पेक्षा जास्त गुण असतात.

B) राष्ट्रीय बहुआयामी निर्धनता निर्देशांक (National MPI)
- **मोजणारी संस्था: नीती आयोग** (OPHI व UNDP च्या सहकार्याने).
- **उद्देश: शाश्वत विकास ध्येय (SDG) 1.2** (बहुआयामी दारिद्र्य दूर करणे) ची प्रगती मोजणे.

- **मोजणी पद्धत:** 3 आयाम आणि **12 निर्देशक** (जागतिक MPI पेक्षा 2 अधिक).
- **आरोग्य (Health) (1/3)**
    - पोषण (Nutrition) (1/6)
    - बाल व किशोरवयीन मृत्यू (Child & Adolescent Mortality) (1/12)
    - **मातृस्वास्थ्य (Maternal Health) (1/12)** - *नवीन निर्देशक*
- **शिक्षण (Education) (1/3)** -
    - शालेय शिक्षणातील वर्षे (Years of Schooling) (1/6)
    - शाळेतील उपस्थिती (School Attendance) (1/6)
- **राहणीमान (Living Standards) (1/3)**
    - इंधन, स्वच्छता, पेयजल, वीज, घर, मालमत्ता (प्रत्येकी 1/21 भारांश)
    - **बँक खाते (Bank Account) (1/21)** - *नवीन निर्देशक*
- **भारताची प्रगती (राष्ट्रीय MPI):**
    - **2015-16 (Baseline):** MPI = 0.118
    - **2019-21 (Progress Review):** MPI = **0.066**
    - **यश:** 2013-14 ते 2022-23 या काळात **अंदाजे 24.82 कोटी** लोक बहुआयामी दारिद्र्यातून बाहेर पडले.
    - **सर्वात कमी MPI (चांगले):** केरळ, गोवा, तामिळनाडू.
    - **सर्वात जास्त MPI (वाईट):** बिहार, मेघालय, झारखंड.

बेरोजगारी (Unemployment)

परिभाषा व स्वरूप

- बेरोजगारी म्हणजे काम करण्याची इच्छा, क्षमता आणि पात्रता असूनही एखाद्या व्यक्तीला काम न मिळणे.
- **पूर्ण रोजगार (Full Employment)** ही एक काल्पनिक अवस्था आहे जिथे काम करू इच्छिणाऱ्या सर्वांना रोजगार उपलब्ध असतो. प्रत्यक्षात ही अवस्था गाठता येत नाही.
- बेरोजगारी मोजण्यासाठी **बेरोजगारी दर (Unemployment Rate - UR)** हा मुख्य निर्देशांक वापरला जातो.
- बेरोजगारी दर (UR) = (बेरोजगार व्यक्ती / एकूण श्रमशक्ती) * 100

बेरोजगारीचे प्रकार

A) शहरी बेरोजगारी

1. **संरचनात्मक बेरोजगारी (Structural Unemployment):**
    - **कारण:** अर्थव्यवस्थेच्या मूलभूत संरचनेतील दोष. (उदा., मंद आर्थिक वाढ, कामरहित वाढ, कौशल्य आणि नोकरीतील गरज यात असंतुलन).
    - **उपाय:** मोठ्या प्रमाणावरील गुंतवणूक, संरचनात्मक सुधारणा, कौशल्यविकास.
2. **शैक्षणिक बेरोजगारी (Educated Unemployment):**
    - **कारण:** शिक्षण घेतलेल्या व्यक्तींना त्यांच्या पात्रतेनुसार काम न मिळणे. शिक्षण प्रणाली आणि उद्योगांच्या गरजांमध्ये तफावत.
    - **उपाय:** उद्योग-अनुकूल आणि बदलांचा सामना करू शकणारे शिक्षण.
3. **घर्षणात्मक बेरोजगारी (Frictional Unemployment):**
    - **कारण:** उत्पादन-यंत्रणेतील सततच्या बदलामुळे नोकरी सोडणे आणि नवीन नोकरी शोधणे यामधील कालावधी. (उदा., पेजर उद्योग बंद होऊन मोबाइल उद्योगात रोजगार). ही **तात्पुरती** बेरोजगारी आहे.
    - **उपाय:** कौशल्य अद्ययावत करणे.
4. **चक्रीय बेरोजगारी (Cyclical Unemployment):**
    - **कारण:** अर्थव्यवस्थेतील तेजी-मंदीच्या चक्रामुळे. मंदीदरम्यान उद्योग बंद पडल्याने होणारी बेरोजगारी.
    - **उपाय:** सरकारी राजकोषीय आणि चलनविषयक धोरण.

5. **न्यून बेरोजगारी (Underemployment):**
   - **कारण:** एखाद्या व्यक्तीच्या क्षमतेपेक्षा कमी दर्जाचे किंवा पगाराचे काम करणे. (उदा., पदवीधर व्यक्तीने कारकुनाचे काम करणे).

B) ग्रामीण बेरोजगारी

1. **हंगामी बेरोजगारी (Seasonal Unemployment):**
   - **कारण:** शेती पावसावर अवलंबून असल्याने वर्षातून फक्त काही महिनेच काम उपलब्ध असणे.
   - **उपाय:** सिंचनक्षमता वाढवणे, कृषीसंलग्न उद्योग, MGNREGA सारख्या योजना.
2. **प्रच्छन्न बेरोजगारी (Disguised Unemployment):**
   - **कारण:** एखाद्या कामात आवश्यकतेपेक्षा जास्त लोक काम करत असणे. काही लोकांना काढूनही उत्पादनावर परिणाम होत नाही. (संकल्पना: **रॅगनर नर्क्से**).
   - **उपाय:** कृषीक्षेत्रावरील अवलंबित्व कमी करून कृषीतर रोजगार निर्माण करणे.

बेरोजगारी मोजण्याच्या पद्धती (NSSO/PLFS)

1. **सामान्य स्थिती (US - Usual Status):**
   - **व्याप्ती:** वर्षभराच्या कालावधीतील रोजगार/बेरोजगारी दर्शवते. **चिरकालीन बेरोजगारी** मोजते.
   - **बेरोजगार:** ज्याला वर्षभरात 2 महिन्यांपेक्षा कमी काम मिळाले.
2. **वर्तमान साप्ताहिक स्थिती (CWS - Current Weekly Status):**
   - **व्याप्ती:** सर्वेक्षणाच्या आठवड्यातील रोजगार/बेरोजगारी दर्शवते. **अल्पकालीन बेरोजगारी** मोजते.
   - **बेरोजगार:** ज्याला आठवड्यात एकही तास काम मिळाले नाही.
3. **वर्तमान दैनिक स्थिती (CDS - Current Daily Status):**
   - **व्याप्ती:** सर्वात काटेकोर पद्धत. सर्वेक्षण आठवड्यातील प्रत्येक दिवसाची स्थिती 'व्यक्ती-दिवस' या एककात मोजते. **आंशिक बेरोजगारी** समाविष्ट करते.
   - **बेरोजगार:** ज्याला दिवसात एकही तास काम मिळाले नाही.

मानव विकास निर्देशांक (HDI - Human Development Index)

- **मोजणारी संस्था: UNDP** (संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम). पहिला अहवाल 1990 मध्ये प्रकाशित.
- **मोजणी पद्धत:** तीन आयामांवर आधारित:
  1) **दीर्घ आणि निरोगी जीवन (आयुर्मान):** जन्मावेळी सरासरी आयुर्मान.
  2) **ज्ञानाची सुगमता (शिक्षण):** शालेय शिक्षणातील सरासरी वर्षे आणि अपेक्षित शिक्षणाची वर्षे.
  3) **चांगले राहणीमान (उत्पन्न):** दरडोई GNI (क्रयशक्ती समानता - PPP).
- **स्कोर:** 0 (सर्वात खराब) ते 1 (सर्वोत्तम).
- **भारताची स्थिती (2023-24 अहवाल):**
  1) HDI = **0.644**
  2) **क्रमांक:** 193 देशांपैकी **134 वा.**
  3) **श्रेणी: मध्यम मानव विकास.**
  4) **तुलना:** स्वित्झर्लंड (1ला), सोमालिया (193वा). BRICS देशांपैकी रशिया (56वा) आणि चीन (75वा) यांच्या मागे.

असमानता समायोजित मानव विकास निर्देशांक (IHDI)

- **मोजणारी संस्था:** UNDP (2010 पासून).
- **मोजणी पद्धत:** HDI च्या तीनही आयामांतील (**आयुर्मान, शिक्षण, उत्पन्न**) देशातील अंतर्गत असमानता विचारात घेऊन HCI मध्ये समायोजन करते.
- **महत्त्व:** हा निर्देशांक **सामाजिक वंचितता** दर्शवितो.
- **भारताची स्थिती (2022):** IHDI = **0.444**. HDI (0.644) आणि IHDI यात **31.1%** ची घट, जी मोठ्या असमानतेचे द्योतक आहे.

लिंग असमानता निर्देशांक (GII - Gender Inequality Index)

- **मोजणारी संस्था:** UNDP (2010 पासून).
- **मोजणी पद्धत:** तीन आयामांवर आधारित:
  1) **प्रजनन आरोग्य:** माता मृत्यू प्रमाण, पौगंडावस्थेतील जन्मदर.
  2) **सशक्तीकरण:** संसदेतील सहभाग, माध्यमिक शिक्षण.
  3) **रोजगार क्षेत्र:** श्रमशक्तीत सहभाग.
- **स्कोर:** 0 (पूर्ण लिंग समानता) ते 1 (पूर्ण असमानता).
- **भारताची स्थिती (2022):** GII = **0.437**. **क्रमांक:** 108.

लिंग आधारित विकास निर्देशांक (GDI - Gender Development Index)

- **मोजणारी संस्था:** UNDP.
- **मोजणी पद्धत:** पुरुषांचा HCI आणि स्त्रियांचा HCI वेगळा काढून त्यांचे गुणोत्तर.
- **स्कोर:** 1 च्या जवळ असलेले मूल्य लिंग समानता दर्शवते.
- **भारताची स्थिती (2022):** GDI = **0.852** (स्त्री HDI = 0.582, पुरुष HDI = 0.684).

जागतिक लिंग अंतर निर्देशांक (GGGI - Global Gender Gap Index)

- **मोजणारी संस्था: जागतिक आर्थिक मंच (World Economic Forum)** (2006 पासून).
- **मोजणी पद्धत:** चार आयाम:
  1) आर्थिक सहभाग व संधी
  2) शैक्षणिक क्षमता
  3) आरोग्य व टिकाव
  4) राजकीय सशक्तीकरण
- **स्कोर:** 0 (मोठे अंतर) ते 1 (लिंग समानता).
- **भारताची स्थिती (2023):** GGGI = **0.643**. **क्रमांक:** 146 देशांपैकी **127 वा.**

ग्रहविषयक दबाव समायोजित मानव विकास निर्देशांक (PHDI)

- **मोजणारी संस्था:** UNDP (2020 पासून).
- **मोजणी पद्धत:** हा निर्देशांक **पर्यावरणीय ऱ्हास** विचारात घेतो. हे **पिढ्यांतर्गत न्याय (Intergenerational Equity)** मोजते. यासाठी दोन घटक विचारात घेतात:
  1) **दरडोई CO_2 उत्सर्जन**
  2) **दरडोई मूर्त ठसे (Material Footprint)**
- **महत्व:** हे दर्शविते की एखाद्या देशाचा विकास **शाश्वत** आहे की नाही.
- **भारताची स्थिती (2022):** PHDI = **0.625** (HDI = 0.644). PHDI आधारित भारताची क्रमवारी 8 अंकांनी सुधारते, कारण अनेक श्रीमंत देश (उदा., स्वित्झर्लंड, अमेरिका) त्यांच्या मोठ्या पर्यावरणीय ठशामुळे मागे पडतात.

निर्देशांकांचा सारांश

निर्देशांकाचे नाव	**मोजणारी संस्था**	**मुख्य उद्देश**	**भारताचे स्कोर (ताजे)**
मानव विकास निर्देशांक (HDI)	UNDP	एकूण मानवी विकास मोजणे	0.644 (134 वा क्रमांक)
असमानता समायोजित HDI (IHDI)	UNDP	देशातील आतील असमानता मोजणे	0.444
लिंग असमानता निर्देशांक (GII)	UNDP	लैंगिक असमानता मोजणे	0.437 (108 वा क्रमांक)
लिंग आधारित विकास निर्देशांक (GDI)	UNDP	पुरुष-स्त्री विकासातील फरक	0.852
जागतिक लिंग अंतर निर्देशांक (GGGI)	World Economic Forum	लिंग समानतेच्या दिशेने प्रगती	0.643 (127 वा क्रमांक)
ग्रह दबाव समायोजित HDI (PHDI)	UNDP	शाश्वत विकास मोजणे	0.625

4 प्रकरण

पैसा (Money)

पैसा (Money)

- **पैसा** म्हणजे अर्थव्यवस्थेतील अशी कोणतीही वस्तू किंवा नोंद, जी वस्तू आणि सेवा खरेदी करण्यासाठी किंवा कर्जाची फेड करण्यासाठी देय म्हणून **सामान्यतः स्वीकारली** जाते.
- **फ्रान्सिस वॉकर:** "पैसा जे कार्य करतो, तोच पैसा असतो." (Money is what money does).
- **डी. एच. रॉबर्टसन:** "वस्तू किंवा सेवेच्या बदल्यात जे व्यापकपणे स्वीकृत होते तो म्हणजे पैसा."
- **प्रो. क्राऊथर:** यांनी पैशाची **कार्ये आणि स्वीकृती** दोन्ही लक्षात घेऊन केलेली व्याख्या सर्वसमावेशक मानली जाते.

पैशाची कार्ये (Functions of Money)

A) प्राथमिक कार्ये (Primary Functions)

1. **विनिमयाचे माध्यम (Medium of Exchange):**
   - पैसा हे वस्तू आणि सेवांच्या खरेदी-विक्रीसाठी सामाईक माध्यम आहे.
   - यामुळे **वस्तुविनिमय पद्धतीतील अडचणी** (उदा., 'गरजेच्या दुहेरी जुळणी'ची समस्या) दूर होतात.
   - **उदाहरण:** रुपये देऊन कोणतीही वस्तू खरेदी करता येते.
2. **मूल्यमापनाचे साधन / हिशेबाचे एकक (Measure of Value / Unit of Account):**
   - पैशामुळे सर्व वस्तू आणि सेवांचे मूल्य एकाच मापकात (रुपये/डॉलर) मोजता येते.
   - यामुळे वस्तूंची किंमत ठरवणे आणि त्यांची तुलना करणे सोपे होते.
   - **उदाहरण:** समजा 1 पोते बाजरी = ₹500 आणि 1 कपडा = ₹100, म्हणून 1 पोते बाजरी = 5 कपडे.

B) दुय्यम कार्ये (Secondary Functions)

1. **मूल्यसंग्रहण (Store of Value):**
   - पैशामध्ये क्रयशक्ती साठवून ठेवता येते.
   - पैसा टिकाऊ असल्यामुळे भविष्यातील गरजांसाठी मूल्य सुरक्षित राहते. (चलनवाढ हा अपवाद वगळता).
   - **उदाहरण:** बँकेत पैसे जमा करून ठेवणे.
2. **आस्थगित देयमान (Standard of Deferred Payments):**
   - उधारीचे किंवा भविष्यात देय असलेले देणे पैशात निश्चित केले जाते.
   - पैशाचे मूल्य सापेक्षतः स्थिर असल्यामुळे उधारीचे व्यवहार शक्य होतात.
   - **उदाहरण:** बँक कर्ज, EMI चे हप्ते.

C) अनुषंगिक कार्ये (Contingent Functions) - BOLD

1. **पतआधार (Basis of Credit - B):**
   - बँका ठेवी स्वरूपात गोळा केलेल्या पैशावरच आधारित कर्जे (पत) देतात.
2. **पर्याय निर्माता (Option Bearer - O):**
   - पैसा असल्यामुळे ग्राहकाला विविध वस्तूंमधून निवड करण्याचे स्वातंत्र्य मिळते.
3. **संपत्तीची तरलता (Liquidity to Wealth - L):**
   - पैशामुळे जमिनी, सोने यासारख्या संपत्तीचे सहज रोख रूपांतर करता येते.
4. **उत्पन्न वितरण (Distribution of Income - D):**
   - पैशामुळे देशाचे एकूण उत्पन्न मोजता येते, ज्यावर आधारित करधोरणाद्वारे उत्पन्नाचे वितरण करता येते.

वैध चलन (Legal Tender)

- कायद्याने मान्यता असलेले व सर्वत्र देणे-घेण्यासाठी स्वीकारले जाणारे चलन म्हणजे **वैध चलन**. असे चलन सर्वसाधारणपणे सर्वांद्वारा स्वीकारले जाते. भारतात नाणी आणि नोटा हे दोन्ही वैध चलनाचे स्वरूप आहेत.

नाण्यांचा इतिहास

- **प्रारंभ:** भारतीय नाण्यांचा प्रवास **भारतीय नाणे कायदा 1835** पासून सुरू झाला.
- **शेर शहा सुरी (1540-1545):** याने 'रुपिया' नावाचे चांदीचे नाणे सुरू केले, जे पुढे 'रुपया' झाले.
- **ईस्ट इंडिया कंपनी:** 1835 च्या कायद्याने कंपनीच्या नाण्यांना कायदेशीर दर्जा मिळाला. मूल्य प्रणाली: 1 रुपया = 16 आणे = 64 पैसे = 192 पै.
- **भारतीय नाणे कायदा 1906:** 1835 च्या कायद्याची जागा घेतली. मुंबई, कोलकाता आणि हैदराबाद या टाकसाळांना वैधानिक दर्जा देण्यात आला.
- **दशमानीकरण (Decimalisation) - 1957:** 1 एप्रिल 1957 पासून दशमान पद्धत लागू झाली. नवीन मूल्यरचना: **1 रुपया = 100 पैसे**.
- **भारतीय नाणे कायदा 2011:** या एकच कायद्यात नाण्यांसंबंधीचे सर्व जुने कायदे एकत्रित करण्यात आले. या कायद्यानुसार **1 पैसा ते 25 पैशांची नाणी** आता विधीग्राह्य चलन **नाहीत** (त्यांचे तांत्रिक विमुद्रीकरण झाले आहे).
- **वैध नाणी:** 50 पैसे, 1 रुपया, 2 रुपये, 5 रुपये, 10 रुपये आणि 20 रुपये.
- **टाकसाळी (Mints): भारतात चार टाकसाळी आहेत:** कोलकाता (स्थापना 1757): **चिन्ह - काहीही नाही.** मुंबई (स्थापना 1829): **चिन्ह - चौकोन (▫) किंवा 'B'/'M'.** हैदराबाद (स्थापना 1803): **चिन्ह - तारा (✶).** नोएडा (स्थापना 1988): **चिन्ह - टिंब (•). या सर्व टाकसाळींचे व्यवस्थापन** SPMCIL **(Security Printing & Minting Corporation of India Limited) करते.**

नोटांचा इतिहास

- **पहिली 1 रुपयाची नोट:** 1917 मध्ये पहिल्या महायुद्धादरम्यान छापली गेली.
- रिझर्व्ह बँकेची भूमिका: रिझर्व्ह बँक कायदा 1934. **1935 मध्ये रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI) स्थापन झाली. नोटा छापण्याचा अधिकार RBI ला मिळाला. (नाणी छापण्याचा अधिकार सरकारकडेच राहिला).**
- **विमुद्रीकरण (Demonetisation):** भारतात तीन वेळा मोठ्या प्रमाणावर विमुद्रीकरण झाले आहे:

वर्ष	**बाद झालेल्या नोटा**	**उद्देश**
1946	500, 1000, 10,000 रुपयांच्या नोटा	काळा पैसा बाहेर काढणे
1978	1000, 5000, 10,000 रुपयांच्या नोटा	काळा पैसा बाहेर काढणे
2016	500 आणि 1000 रुपयांच्या (जुन्या) नोटा	काळा पैसा, नकली नोटा आणि भ्रष्टाचार रोखणे

- **चलन निर्मितीच्या पद्धती:**
    - **प्रमाण निधी पद्धत (1956 पर्यंत):** एकूण चलनापैकी 40% सोने आणि 60% परकीय सरकारी रोखे तारण ठेवावे लागत.
    - **किमान निधी पद्धत (1956 पासून):** RBI ला फक्त **200 कोटी रुपये** किमान निधी ठेवावा लागतो (115 कोटी सोने + 85 कोटी परकीय रोखे). या पद्धतीत RBI ला अमर्याद चलन छापता येते.
- **वैध नोटा:** 2, 5, 10, 20, 50, 100, 200, 500 रुपयांच्या नोटा. (1 रुपयाची नोट सरकार छापते, तर इतर RBI).
- **महात्मा गांधी नवीन मालिका:** 2016 नंतर नवीन धाटणीच्या 500, 2000 रुपयांच्या नोटा आल्या. नंतर 200, 50, 20 रुपयांच्या नोटा देखील आल्या.
- छापखाने (Currency Presses): **नाशिक, देवास, म्हैसूर (BRBNMPL), सालबोनी (BRBNMPL).**

<u>महत्त्वाच्या संकल्पना</u>

- **ग्रेशमचे तत्त्व (Gresham's Law): "**वाईट पैसा चांगल्या पैशाला चलनातून बाहेर सारतो**."**
- **1 रुपयाची नोट: भारत सरकार** छापते. यावर **वित्त सचिवाची** सही असते.
- **इतर सर्व नोटा (2 रु. पासून): RBI** छापते. यांना **बँकनोट** म्हणतात व यावर **RBI गव्हर्नरची** सही असते. ही एक प्रकारची 'वचनचिठ्ठी' (Promissory Note) असते.
- **डिजिटल रुपया (e₹ - Central Bank Digital Currency)**: **CBDC:** हे रिझर्व्ह बँकेने जारी केलेले डिजिटल चलन आहे, जे भौतिक चलनाचे डिजिटल रूप आहे.

Toppersnotes
Unleash the topper in you